एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-९ (सीपीटीपी-९) मधील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक संचालक, गट-अ (कनिष्ठ) संवर्गातील १२ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांना नियमित पदस्थापना देण्याकरिता महसुली विभाग पसंतीक्रम मागविणेबाबत.

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

**संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

क्र.संलेको/प्रशा-राप/का-४/सीपीटीपी-९/२०२५/११०३

तळ मजला, कस्तुरी इमारत, पेट्रोलियम हाऊससमोर, जमशेदजी टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

दिनांक :- २१ नोव्हेंबर, २०२५

संदर्भ: - अवर सचिव, वित्त विभाग (कोषा. प्रशा.२) यांचे पत्र क. संलेको २०२३/प्र.क्र.१६१/कोषा.प्रशा.-२ दि.१९/११/२०२५

## परिपत्रक :-

एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-९ (सीपीटीपी-९) मधील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक संचालक, गट-अ (कनिष्ठ) संवर्गातील १२ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांना नियमित पदस्थापना देण्याकरिता महसुली विभाग पसंतीक्रम मागविणेबाबत उक्त उल्लेखित पत्रान्वये निर्देश प्राप्त झाले आहेत.

२. सहायक संचालक गट-अ (कनिष्ठ) संवर्गातील रिक्त पदांवर नियमित पदस्थापना देण्याकरिता सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना असाधारण क्रमांक १२० क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२, दि.१४/०७/२०२१ मधील तरतुदी विचारात घेऊन परिच्छेद क्र.४ मधील नमूद अधिकाऱ्यांनी आपला महसुली विभाग पसंतीक्रम सोबत जोडलेल्या विकल्प नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह शुक्रवार दि.२८ नोव्हेंबर, २०२५ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत संचालनालयास सादर करावा.

३. हे परिपत्रक संचालनाच्या https://www.mahakosh.maharashtra.gov.in/ या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत असून त्याकरिता स्वतंत्र पत्र निर्गमित केले जाणार नाही याची सबंधितानी नोंद घ्यावी. संबंधित अधिकाऱ्यांनी आपले विकल्प प्रत्यक्ष संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई येथे अथवा adtranfer2021@gmail.com याच ई-मेलवर (स्वाक्षरी केलेले विकल्प व कागदपत्रे केवळ PDF स्वरुपातच) विहीत मुदतीत सादर करावेत. संचालनालयाच्या अन्य ई-मेलवर पाठविण्यात आलेले विकल्प विचारात घेतले जाणार नाहीत. ई-मेलव्दारे सादर केलेल्या विकल्पाची मूळ स्वाक्षरीकृत प्रत संचालनायास तात्काळ सादर करावी. संचालनालयास प्रत्यक्ष प्राप्त होणारा किंवा ई-मेलवर प्राप्त होणारा पहिला विकल्प ग्राह्य धरण्यात येईल; तद्नंतर प्राप्त होणारे विकल्प ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. तसेच विहित नमुन्यात कोणताही विकल्प न देता प्राप्त होणाऱ्या अथवा विकल्प नमुना स्वाक्षरीकृत न केलेल्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत प्रशासकीय सोईनुसार महसुली विभाग वाटप करण्यात येईल. **एकदा दिलेला विकल्प कोणत्याही परिस्थितीत बदलता अथवा मागे घेता येणार नाही याची सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.**

४. अधिकाऱ्यांच्या नावाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :

| अ. क्र. | तात्पुरत्या सेवाज्येष्ठता यादीमधील गुणवत्ता क्र. | नाव | अ. क्र. | तात्पुरत्या सेवाज्येष्ठता यादीमधील गुणवत्ता क्र. | नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | श्री. जयेश प्रशांत देवरे | ७ | ७ | श्री. अमोल विलास पवार |
| २ | २ | श्री. संदेश सुभाष सपकाळ | ८ | ८ | श्रीमती पुजा दत्तात्रय दाभाडे |
| ३ | ३ | श्री. अमोल तुकाराम चव्हाण | ९ | ९ | श्री. राहूल बाळकृष्ण गावकर |
| ४ | ४ | श्री. म. तौसीफ़ म हसिन | १० | १० | श्री. सचिन पदम परदेशी |
| ५ | ५ | श्री. राहूल शिवाजीराव पाटील | ११ | ११ | श्रीमती तृप्ती कृष्णा टेमकर |
| ६ | ६ | श्री. सोमनाथ रमेश कराड | १२ | १२ | श्री. महेश शिवाजी गुंजाळ |

५. महाराष्ट्र वित्त व सेवा सहायक संचालक गट-अ (कनिष्ठ) संवर्गातील रिक्त पदांची विभागनिहाय स्थिती पुढीलप्रमाणे आहे :

| अ.क्र. | महसुली विभाग | रिक्त पदसंख्या |
|---|---|---|
| १ | नागपूर | १८ |
| २ | अमरावती | १२ |
| ३ | छत्रपती संभाजीनगर | १३ |
| ४ | कोंकण-१ | ०३ |
| ५ | नाशिक | १० |
| ६ | कोंकण-२ | ४२ |
| ७ | पुणे | ०६ |

सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना असाधारण क्रमांक १२० क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२, दि.१४/०७/२०२१ मधील तरतुदीनुसार महसुली विभाग वाटप करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

रश्मी नांदिवडेकर

(रश्मी नांदिवडेकर)
सहसंचालक (प्रशासन)
संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई

सोबत : विकल्प नमुना

# विकल्पाचा नमुना

**सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना असाधारण क्रमांक १२० क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२, दि.१४ जुलै, २०२१ अनुसार विभागीय संवर्गाकरिता द्यावयाचा विकल्प.**

मी, श्री./श्रीम. ________________________________________,
याद्वारे असे लिहून देतो / देते की, माझा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक संचालक, गट-अ (कनिष्ठ) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा या पदासाठी सरळसेवेने निवड झाली आहे. सदर पदास "महाराष्ट शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम, २०२१" लागू असून माझी सहायक संचालक, गट-अ (कनिष्ठ) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा या पदावर नियुक्ती झाल्यावर या नियमावलीतील तरतुदी मला लागू होणार आहेत.

सदर नियमावलीतील तरतुदींच्या अनुषंगाने मी सहायक संचालक, गट-अ (कनिष्ठ) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा पदावर पदोन्नतीकरिता माझा पहिला पसंतीक्रम #_______________ या विभागीय संवर्गासाठी देत आहे.

तसेच - *i) उपरोक्त शासन अधिसूचना दि.१४.०७.२०२१ मधील अ.क्र.७ मध्ये माझे प्रकरण येत नाही.
ii) उपरोक्त शासन अधिसूचना दि.१४.०७.२०२१ मधील अ.क्र.७ मध्ये माझे प्रकरण येत असून त्यापृष्ठ्यर्थ आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत जोडल्या आहेत.
(जोडलेल्या कागदपत्रांची यादी)

दिनांक :

ठिकाण :

(स्वाक्षरी)

(संपूर्ण नांव - ______________________________)

(भ्रमणध्वनी क्रमांक - ________________________)

(ई-मेल - _______________________________)

# १) नागपूर, २) अमरावती, ३) छत्रपती संभाजीनगर, ४) कोकण-१, ५) नाशिक, ६) कोकण-२, ७) पुणे यापैकी कोणताही एक महसूली विभाग नमूद करावा.

* लागू नसेल ते खोडावे.